२२ee३/e४

परवानगी वर्ष : २००३- २०० ४

माध्यम : मराठी/कायमविनाअनुदान

जा.क्र. माध्य २ (१८) प्रथम मान्यता/पु.वि २००-

शिक्षण उपसंचानालय

पुणे विभाग पुणे- १ यांचे कार्यालय

दिनांक : 02 SEP 2002

प्रति,

शिक्षणाधिकारी (माध्यमिक),

जिल्हा परिषद, पुणे

विषय : प्रथम मान्यता

श्री. संत तुकाराम महाराज माध्यमिक विद्यालय, चिखली पुणे.६२

संदर्भ : १ आपले पत्र क्र. शिक्षण माध्य. /ह-४ /पु.मा. ०३ दि. २६.०८.२००२

२ शा.प.क्र.नमाशा. १००२/[३३७]/२ २००३/माशी दि. ३०.०५.२००२

३ कार्यालयाचे पत्र क्र. जा. क्र. माध्य. ३/१४/नमाशा/२०४१/पुवि/१००१ दि. २८.०६.०

वरील संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात येते की, माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१.३.२ व ३.३ अन्वये नवनगर शिक्षण मंडळ, आकुर्डी पुणे. ३५ संस्थेच्या श्री. संत तुकाराम महाराज माध्यमिक विद्यालय, चिखली पुणे.६२ माध्यमिक शाळेच्या कायम विनाअनुदान तत्वावर इयत्ता आठवी च्या वर्गास २०० -२ २०० ४ या शैक्षणिक वर्षासाठी जुन २००३ पासून प्रथम मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता खालील अटींची पूर्ततेस अधीन राहून देत आहे. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी खालील अटींची पुर्तता करीत आहे किंवा नाही याची छाननी करून पुढिल मान्यतेच्या वेळी प्रस्ताव पाठविताना खालील अटी पुर्ण केलेल्या आहेत किंवा नाही याबाबत अहवाल प्रस्तावासोबत पाठविण्यात यावा.

१. संस्थेने स्वतःच्या मालकीची शैक्षणिकदृष्ट्या योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करून घ्यावी.
२. मुख्याध्यापक पदी पात्र व अनुभवी व्यक्तीची नेमणूक करावी.
३. स्वतंत्र व विषयावार प्रयोगशाळा सर्व साहीत्यानिशी उपलब्ध करून घ्यावी.
४. स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करून दरवर्षी अधिक त्यामध्ये ग्रंथांची भर घालावी.
५. विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून घ्यावे.
६. पुरेसा प्रशिक्षित शिक्षक वर्ग उपलब्ध करून घ्यावा.
७. स्वतंत्र स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध करून घ्यावी.
८. वाढीव फी चे दर मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांचेकडून मंजूर करून घ्यावेत.
९. शालेय रेकॉर्ड माध्यमिक शाळा संहिता नियमावली प्रमाणे ठेवून त्यांत अदयावत नोंदी घेण्यात याव्यात.
१०. कर्मचाऱ्यांना सरकारी वेतनश्रेणीनुसार वेतन अदा करावे.
११. शिक्षकांची भविष्य निर्वाह निधी खाती उघडावीत.
१२. विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करावी.
१३. तपासणी अहवालातील सुचनांची पुर्तता करावी.
१४. पालक शिक्षक संघाची स्थापना करावी.
१५. विद्यार्थ्यांसाठी संगणक सुविधा उपलब्ध करावी.
१६. विद्यार्थी संख्या वाढवावी.
१७. सोबतच्या त्रुटीची पुर्तता करण्यावर सदरची प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

स्थळप्रतीवर मा. शि. उ. सं. यांची सही आहे.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे–1 करिता

प्रत :
1 मुख्याध्यापक

श्री. संत तुकाराम महाराज माध्यमिक विद्यालय
चिखली पुणे ६२

**मुख्याध्यापक**
**श्री शिवछत्रपती माध्यमिक विद्यालय,**
**म्हेत्रेवस्ती, चिखली, पुणे-६२**

मुख्याध्यापिका
श्री. संत तुकाराम महाराज
माध्यमिक विदयालय म्हेत्रेवस्ती
चिखली-६२